# मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येला जबाबदार घटक

**महेश प्रतापराव गोळेकर**
संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.
mgolekar143@gmail.com

## प्रस्तावना

भारत हा एक कृषीप्रधान देश आहे. "जय जवान, जय किसान" या घोषणेतून भारताचे माजी पंतप्रधान स्व. लालबहादूर शास्त्री यांनी भारताच्या विकासातीलच नव्हे तर भारताच्या अस्तित्वाची अपरिहार्यता म्हणून शेतकऱ्यांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. आज भारतातील ५० टक्के श्रमशक्ती कृषी आणि संलग्न क्षेत्रात गुंतलेली आहे. सन 2010 साली एकूण जी. डी. पी. च्या १८ टक्के वाटा हा कृषी क्षेत्राचा होता. आजही भारताची ६५ टक्के लोकसंख्या खेड्यांत वसते. शेती हा खेड्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. म्हणूनच शेतीस भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असे संबोधतात. मात्र आज कुठेतरी हा कणा मोडकळीस आल्याचे आपणास दिसत आहे. कृषी क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा उत्तरोत्तर कमी होत आहे. भारतात शेतजमिनीचे मोठ्या प्रमाणात तुकडीकरण होवून शेतकऱ्यांची जमीन धारणा अत्यल्प होत असून तीची उत्पादकता घटली आहे. आधुनिक शेतीत कृषी अदानांचा खर्च वाढला असून तुलनेने नफ्याचे प्रमाण घटले आहे. भारताने 1991 साली खा. उ. जा. धोरणाचा स्विकार करून जागतिक पातळीवर मुक्त बाजारपेठ स्थापित केल्याने शेतकऱ्यासमोरील आव्हानात आणखिनच भर पडली. भारतीय शेती ही नैसर्गिक पाऊसावर अवलंबून असून एकिकडे सततचा दुष्काळ तर दुसरीकडे अतिवृष्टीने महापुराचे थैमान अशा स्थितीत भारतीय शेतकरी आसमानी आणि सुलतानी या दोन्ही आघाड्यांवर संकटांच्या भोवऱ्यात सापडला आहे. परिणामी नैसर्गिक व मानव निर्मित संकटे आणि जोडीला सामाजिक ऐक्याचा अभाव या त्रयीमुळे आधारहीन व दीन आलेला हा शेतकरी बांधव आत्महत्येचा मार्ग अवलंबून आपले जीवन संपवित आहे.

1991 सालानंतर शेतकरी आत्महत्या या समस्येने भारतात गंभिर स्वरूप धारण केले. 1995 ते 2018 या काळात भारतात 2,96,438 शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. यापैकी 60,750 आत्महत्या या एकट्या महाराष्ट्रात झाल्या आहेत. साधारणपणे दररोज 10 या संख्येने महाराष्ट्रात शेतकरी आत्महत्या करत आहेत. यावरून आपणास या समस्येच्या भिषणतेची प्रचिती येते.

आत्महत्या ही आजची समस्या नाही. पूर्वीपासूनच समाजात आत्महत्येचे प्रचलन आहे. पूर्वी क्वचित घडणारी आत्महत्या आज रोजचीच सामान्य घटना बनली आहे. एमिल दरखिम या फ्रेंच समाजशास्त्रज्ञाने सन 1897 मध्ये "द सुसाईड" या ग्रंथात आत्महत्या संदर्भात सविस्तर विश्लेषण केले आहे. दरखिम यांच्या मते, "प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे किंवा सकारात्मक वा नकारात्मक ज्या कृतीचा शेवट आत्मनाशात होतो अशी

व्यक्तीकडून घडणारी कोणतीही कृती म्हणजे आत्महत्या होय. आत्महत्या ही वैयक्तिक घटना नसून ती सामाजिक घटना आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1. शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार असणाऱ्या घटकांचा शोध घेणे.

2. शेतकऱ्यांच्या आत्महत्येवर उपाय सुचविणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला असून संशोधन समस्येसंबंधी आवश्यक असलेली तथ्ये व माहिती ही द्वितीय स्त्रोतांच्या माध्यमातून संकलीत केली आहे. यात विविध संदर्भग्रंथ, वर्तमान पत्रे, मासिके, नियतकालिके, शासकीय अहवाल, इंटरनेट इत्यादी दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे.

**2011 ते जून 2019 या कालावधीत मराठवाड्यामध्ये**

**शेतकऱ्याच्या झालेल्या आत्महत्या दर्शविणारा तक्ता**

| वर्ष | शेतकरी आत्महत्यांची संख्या |
|---|---|
| 2011 | 169 |
| 2012 | 198 |
| 2013 | 207 |
| 2014 | 574 |
| 2015 | 1133 |
| 2016 | 1053 |
| 2017 | 991 |
| 2018 | 947 |
| जून 2019 पर्यंत | 434 |

जानेवारी 2019 ते जुन 2019 या 6 महिन्यामध्ये मराठवाड्यात 434 शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. हे वास्तवदर्शी चित्र भयावह आहे. शेतकरी आत्महत्येचे सत्र रोखण्यासाठी शासकीय व सामाजिक या दोन्ही पातळीवर प्रमाणिक प्रयत्नांची गरज आहे.

**शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार घटक**

शेतकऱ्यांच्या आत्महत्येस आर्थिक, सामाजिक, राजकीय, नैसर्गिक, कृषीविषयक व वैयक्तिक यासारखे अनेक घटक जबाबदार आहेत. या जबाबदार घटकांच्या एकत्रितपणे घेतलेला आढावा खालीलप्रमाणे:

1. नापिकी, 2. सततचा दुष्काळ, 3. व्यसनाधिनता, 4. कौटुंबिक वाद–विवाद, 5. व्याभिचार, 6. जुगार, 7. कौटुंबिक विघटन, 8. कर्जबाजारीपणा, 9. सावकारी जाच, 10. सामाजिक समारंभावर होणारा अवाजवी खर्च, 11. मुलीचा विवाह आणि हुंड्याचा प्रश्न, 12. कुटुंबियांच्या गरजा भागविण्याची असमर्थता, 13. अज्ञान, 14. व्यक्तिगत हवेदावे 15. आजारपण, 16. कार्यसंस्कृतीचा अभाव, 17. शेतकऱ्यांचे फसलेले आर्थिक व्यवहार, 18. भौतिक सुविधांवरील अनावश्यक खर्च, 19. व्यापाऱ्यांकडून होणारी फसवणूक, 20. सदोष विक्री आणि वितरण व्यवस्था, 21. वाढती महागाई, 22. बँकांचे आडमुळे धोरण, 23. वीज वितरण कंपन्यांचा बेजबाबदार कारभार, 24. जागतिकीकरणामुळे निर्माण झालेली स्पर्धा, 25. शेतमालाच्या किंमतीत होणारे चढ–उतार, 26. शासनाची चूकलेली धोरणे, 27. राजकीय व प्रशासकीय भ्रष्ट्राचार, 28. प्रशासनाचा कामचुकारपणा, 29. कृषीप्रती राजकीय अनास्था, 30. शेतकऱ्यांची वाढती राजकीय सहभागिता व सक्रियता, 31. शेतजमिनीचे तुकडीकरण, 32. अल्प भूधारणा, 33. शेतजमिनीच्या उत्पादन क्षमतेत झालेली घट, 34. उत्पादन खर्चात झालेली वाढ, 35. अवेळी पडणारा पाऊस व गारपीट, 36. बियाणे व खतांत होणारी भेसळ व फसवणूक, 37. जलसिंचनाचा अभाव, 38. पिकांवरील रोगांचा प्रादूर्भाव, 39. कृषी संशोधन केंद्र आणि कृषी विद्यापीठांची निष्क्रीयता, 40. सामाजिक ऐक्याचा अभाव इ.

**शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी उपाय:**

1. नदीजोड प्रकल्प राबवून कोकण, प. महाराष्ट्र व उ. महाराष्ट्रात वाहणाऱ्या नद्यांचे अतिरिक्त पाणी मराठवाड्यात वळवावे.
2. शासकीय योजनेत होणाऱ्या भ्रष्ट्राचाराचे निर्मूलन करून योजनेची प्रामाणिक अमंलबजावणी करणे.
3. कृषी विपणन आणि वितरण व्यवस्थेतील अडत्या, दलाल व तत्सम मध्यस्थांचे उच्चाटन करावे.
4. शेतकरी आणि ग्राहक यांच्यात थेट संबंध प्रस्थापित होतील अशी व्यवस्था निर्माण करावी.
5. गट शेती, समूह शेतीस चालना देणे.
6. सिंचन क्षेत्राचा विस्तार करून अस्तित्वात असलेल्या जलस्त्रोतांचे पुनरूज्जीवन करणे.
7. पीक संरचनेत बदल करून अचूक पीक व्यवस्थापन करणे.
8. राष्ट्रीयकृत बँकाकडून कर्जाची पुरेशी उपलब्धता करणे व खाजगी सावकारीचे उच्चटन करणे इ.

**सारांश :**

मराठवाड्यातील शेतकरी आज नैसगिक आणि मानवनिर्मित अशा दुहेरी संकटांना सामोरे जात असतांना परिस्थितीसमोर हतबल होवून वैफल्यग्रस्तता आणि नैराश्याच्या स्थितीत आत्महत्येला कवटाळून स्वतः ची जीवन यात्रा संपवित आहेत. मराठवाड्यात 2011 ते जून 2019 या कालावधीत 5,706 शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या या समस्येने मराठवाड्यासह संपूर्ण भारतभर गंभीर स्वरूप धारण केले आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी शासकीय प्रयत्न अपुरे ठरत असून गैरसरकारी सेवाभावी संस्था आणि व्यक्तिगत पातळीवर प्रयत्न आवश्यक आहेत. निकोप सामाजिक वातावरणाची निर्मिती आणि सामाजिक ऐक्याची प्रस्थापना ही काळाची अपरिहार्यता बनली आहे.

**संदर्भसूची**


- Durkheim, Emile. (1951). Suicide - A Study in Sociology (Tran.). London and New York: The Free Press.
- दैनिक सकाळ, मराठवाडा विशेष, दि. 6 एप्रिल 2016, पान क. 03.
- महाराष्ट्र टाइम्स, दुष्काळाचे सावट, दि. 14 जुलै 2019, पान क्रण 07.
- महाराष्ट्र टाइम्स, सहा महिण्यांत 1300 शेतकरी आत्महत्या, इन्यूज, दि. 20 जुलै 2019.
- NCRB Report, Farmer’s Suicide. NCRB/Government of India. Retrived 25th March 2019.